ePaper

## “...म्हणून माझं नाव ‘कानफाट्या’ पडलंय”:अजित पवार



वर्ष - 6 । अंक - 262 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- राज्यातील माणूस भीक मागत नाही तर हिमतीने, कष्टाने संकटावर मात करतो
- सावित्रीच्या २१ लेकिंचा सन्मान!
- महावितरणचा संप मागे


www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 5 जानेवारी 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# जलपर्णीमुक्त नदीचा संकल्प!

## कायमस्वरूपी तोडगा काढण्याची तयारीः महापालिकेच्या पर्यावरण विभागाचा दावा

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातून पवना, इंद्रायणी व मुळा या तीन नद्या वाहतात. या नद्या अतिप्रदुषित झाल्या असून, त्यात दरवर्षी जलपर्णी निर्माण होते. जलपर्णी काढून पात्र स्वच्छ करण्याचे काम महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केले जाते. दरवर्षी जलपर्णी काढूनही ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ते काम आता, पर्यावरण विभागाकडे सोपविण्यात आले आहे. जलपर्णी कायमची नष्ट केली जाईल, असा दावा पर्यावरण विभागाने केला आहे.**



नद्यांच्या सुधार प्रकल्पांवर पालिका तब्बल ४ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. तसेच मैला सांडपाणी प्रकल्पाच्या वाहिन्या सांडपाणी शुद्धीकरण केंद्रास (एसटीपी) जोडण्यात येत आहेत. त्यासाठी कोट्यवधींचा खर्च केला आहे. मात्र, त्यात अद्याप पर्यावरण तसेच ड्रेनेज विभागास १०० टक्के यश मिळालेले नाही. शहरातील अनेक ठिकाणी थेट सांडपाणी व रासायनिक सांडपाणी नदीत मिसळत असल्याच्या कारणांवरून राष्ट्रीय हरित लवाद आणि राज्याच्या पर्यावरण विभागाने पालिका प्रशासनाला अनेकदा नोटीसा पाठवल्या, तरीही पालिकेकडून म्हणावे तशी सुधारणा झाल्याचे चित्र नाही.

रासायनिक सांडपाणी मिसळते या कारणामुळेच स्वच्छ सर्वेक्षणात महापालिकेचे सर्वाधिक गुण घटले होते. परिणामी, शहर सर्वेक्षणात पिछाडीवर आहे. आता, या तीन नदी पात्रातील जलपर्णी काढण्याचे काम आरोग्य विभागाकडून काढून पर्यावरण विभागाकडे देण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला आहे. पर्यावरण विभागाकडून शास्त्रक्त पद्धतीने जलपर्णी काढली जाणार आहे. त्यामुळे जलपर्णीचा प्रश्न कायमचा संपविला जाईल, असा त्यांनी दावा केला आहे. दरम्यान, जलपर्णी काढण्याचे काम आरोग्य विभागाने जून २०२३ पर्यंत दिले आहे. त्यानंतर ते काम पर्यावरण विभाग करणार आहे.

### जलपर्णी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करणार...

**जलपर्णीमुळे नदीचा प्रवाह खुंटतो. त्यामुळे हवेतील ऑक्सिजन पाण्यात मिसळण्याची क्रिया मंदावते. डासांचा प्रभाव वाढतो. रासायनिक खतांचा वापर केलेल्या शेत जमिनीतून झिरपणाऱ्या पाण्यातन आणि शहरातील कारखान्यातील रासायनिकयुक्त सांडपाणी पाण्यात मिसळल्याने जलपर्णी वाढते. ते रासायनिक पाणी जोपर्यंत बंद होत नाही, तोपर्यंत जलपर्णीची वाढ बेसुमार होत राहते. जलपर्णी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यासाठी ते काम पर्यावरण विभागाकडे देण्यात आले आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.**

# अंधश्रध्दा निर्मुलनाचा संदेश : पुणे ते हंपी सायकल यात्रा

## नवी सांगवीतील तरुणांची जिद्द, 3 दिवसांत पार केला 600 किमीचा प्रवास

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अंधश्रध्दा निर्मुलनाचा संदेश देत तरूणांनी पुणे ते हंपी सायकल यात्रा पूर्ण केली आहे. पुणे ते हंपी हा ६०० किलोमीटरचा प्रवास तीन दिवसांत पार केला आहे. या सायकल यात्रेमध्ये नितीन सिरसाट, राहुल शिंदे, सतीश सावंत आणि संदेश गाडे हे सायकलपटू सहभागी झाले होते.**

ही यात्रा दि.२८ डिसेंबरला पिंपरी चिंचवड शहरातील नवी सांगवी येथून सुरु झाली होती. पहिल्या दिवशी पुणे ते मोहोळ २३० किलो मीटरचा प्रवास झाला. दुसऱ्या दिवशी मोहोड ते अलमट्टी धरण हा २११ किलो मीटर आणि तिसऱ्या दिवशी अलमट्टी धरण ते हंपी या ऐतिहासिक शहरापर्यंत १५१ किलो मीटरचे अंतर पार केले. यात्रे दरम्यान या सायकलपटूंनी अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश प्रत्येक गावा गावामध्ये आणि शहरामध्ये दिला.



शॉर्ट न्यूज

### जगातील सर्वात उंच युद्ध क्षेत्रात प्रथमच महिला अधिकाऱ्याची नियुक्ती

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'ती'ने आतापर्यंत विमान चालविले... तिने प्रत्यक्षात युद्धभूमीवर जाऊन कर्तव्यही बजावले... आता तर तिने धाडसाचे शिखर गाठत थेट जगातील सर्वात उंच अशा युद्धभूमीला गवसणी घालत पुन्हा एकदा कर्तबगारी सिद्ध केली आहे. ही देदीप्यमान कामगिरी बजावली आहे कॅप्टन शिवा चौहान हिने. भारतीय सैन्यदलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याचे काम तिने केले आहे. भारतीय सैन्यदलाच्या इतिहासात प्रथमच एका महिला अधिकाऱ्याची नियुक्ती 'ऑपरेशनल' कार्यासाठी सियाचीनच्या १५ हजार ६३२ फूट उंच ठिकाणी असलेल्या 'कुमार पोस्ट' येथे करण्यात आली आहे. त्यामुळे महिला प्रत्येक क्षेत्रात उंची गाठत असल्याचे यातून सिद्ध होत आहे. कारगिल-लेह येथील लष्करी तैनाती आणि सियाचिन बर्फाळ प्रदेशाचे रक्षण करणाऱ्या 'फायर अँड फ्युरी कोअर'ने मंगळवारी (ता. ३) कोअर ऑफ इंजिनियर्समधील कॅप्टन चौहान हिला कुमार पोस्ट येथे तैनात केल्याचे जाहीर केले.

# राज्यातील माणूस भीक मागत नाही; कष्टाने संकटावर मात करतो!

## शरद पवार यांची चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सरकारच्या आर्थिक धोरणामुळे सामान्य माणसापुढे महागाईचे संकट उभे राहिले आहे. बेरोजगारी दूर करण्यासंदर्भात धोरण आणि निर्णय घेण्यास राज्यकर्ते तयार नाही. या परिस्थितीत महापुरुषांनी भीक मागितली, असे विधान राज्यातील नेते करत आहेत. मात्र सामान्य माणूस माणूस मोठ्या हिंमतीने, कष्ट करून संकटावर मात करतो, अशा शब्दात राष्ट्रवादी



काँग्रेसचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका केली.राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जनजागर यात्रेचा शुभारंभ शरद पवार यांच्या हस्ते बुधवारी झाला. त्यावेळी पवार बोलत होते. राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजिया खान, प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण, खासदार सुप्रिया सुळे, अॅड. वंदना चव्हाण,

> “ बेरोजगारी दूर करण्यासंदर्भात धोरण आणि निर्णय घेण्यास राज्यकर्ते तयार नाही. या परिस्थितीत महापुरुषांनी भीक मागितली, असे विधान राज्यातील नेते करत आहेत. मात्र सामान्य माणूस माणूस मोठ्या हिंमतीने, कष्ट करून संकटावर मात करतो.
>
> -शरद पवार, माजी केंद्रीय मंत्री

श्रीनिवास पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, आमदार चेतन तुपे, शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रवादी महिला काँग्रेसने चांगला कार्यक्रम हाती घेतला आहे. विधानसभा आणि लोकसभेतही महिलांना पन्नास टक्के आरक्षण मिळाले पाहिजे. यानिमित्ताने बेरोजगारी आणि महागाईच्या विरोधात जागर केला जाईल. कृषी खात्याचा मंत्री झाल्यावर या क्षेत्रात सगळ्यात चांगलं काम कोणी केले, याची माहिती घेत असातना महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कृषी क्षेत्रात चांगले काम असल्याचे दिसून आले.

# चित्रा वाघ-उर्फी जावेद वाद विकोपाला

## ■ सुप्रिया सुळेंचं राष्ट्रवादीसह मविआ नेत्यांना आवाहन

। पुणे महाईन्यूज ।

गेल्या काही दिवसांपसून बिग बॉस फेम अभिनेत्री ऊर्फी जावेद आणि भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे. या वादाचे पडसाद देखील उमटल्याचं दिसून आलं. सोशल मीडियाच्या माध्यमातून आरोप प्रत्यारोपांचं सत्र सुरु होतं. भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी उर्फीला दिसेल तिथे थोबडवण्याची भाषा देखील वापरण्यात आली. या वादावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांना मत विचारलं असता त्यांनी अशा वेळी मला " कैलासवासी अरुण जेटली आठवतात. ते म्हणायचे तुम्ही दाखवणं बंद करा, लोकं बोलणं बंद करतील." राष्ट्रवादीसह मी महाविकास आघाडीच्या नेत्यांना देखील या बद्दल काही बोलू नये, असं आवाहन करत असल्याचं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस महिला जन जागर यात्रा या कार्यक्रमाच्या उद्घाटनानिमित्त सुप्रिया सुळे पत्रकारांशी बोलत होत्या. सुप्रिया सुळेंना चित्रा वाघ आणि उर्फी जावेद यांच्यातील वादाबद्दल विचारलं असता त्यांनी भूमिका स्पष्ट केली.

मी या प्रश्नां बाबत काल ही बारामतीत बोलले आहे. त्याचसोबत माझं राष्ट्रवादी काँग्रेससह सर्व पक्षांना विनम्र आवाहन आहे, आपल्या गलिच्छ राजकारणासाठी, कोणत्या ही विषयासाठी महिलेविषयी कोणी ही बोलू नये, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. राष्ट्रवादी आणि मविआच्या नेत्यांनी यावर बोलणं टाळावं, असं देखील सुप्रिया सुळेंनी म्हटलं. महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना आवाहन करते की आपल्या राज्याला विशेष परंपरा आहे. सामाजिक परिवर्तनाची सुरुवात महाराष्ट्रातून होते, सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, देशातील पहिल्या महिला डॉक्टर महाराष्ट्रातील होत्या. त्यामुळं आपण या सर्वांचा विचार करून बोललं पाहिजे. त्यामुळं मला अशा प्रश्नांबद्दल मला प्रतिक्रिया विचारली की मी सांगते की मुळात मला जनतेनं त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडून दिलं आहे.



### उर्फीच्या प्रकरणावर रुपालीताई काय म्हणाल्या...

उर्फीच्या तोकड्या कपड्यावरुन चित्रा वाघ आक्रमक झाल्या. भेटेल तिथे थोबडवेन, अशी धमकी उर्फीला चित्रा वाघ यांनी दिली. यावर रुपाली पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. उर्फी मुस्लिम असल्यामुळे चित्रा वाघ टार्गेट करतात का?, तसं असेल तर हे चुकीचे आहे. समाजातील उर्फी जावेदसारख्या असंख्य महिला आहेत. मग त्यांच्यावरही कारवाई होणार का... समाजात अश्लिलता पसरतेय. याबाबत चित्रा वाघ यांनी उर्फी जावेद हिला समज द्यायला हवी. तिने काय कपे घलावे, काय नाही हे ती मुंबई चित्रपट इंडस्ट्री असल्यामुळे अभिनयासाठी किती कपडे उतरवले जातात. किती चढवले जातात. यामध्ये राजकारणी म्हणून आपण काही बोलणे हे चित्रा वाघ यांनी ठरवले पाहिजे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीच्या नेत्या रुपालीताई पाटील यांनी दिली आहे.

## राज्यातील १११ दिव्यांग बांधवानी कळसुबाई शिखर सात तासात केले सर



। मंचर महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगेतील सर्वाधिक उंचीचे कळसुबाई हे शिखर आहे. हे शिखर सर करण्याचे स्वप्न प्रत्येक ट्रेकर्सचे असते पण दिव्यांगांनी हे आवाहन पूर्ण करणे ही खरी कसोटी असते. राज्यातील १११ दिव्यांगांनी एकत्र येत नववर्षाचे स्वागत व स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयाचा जल्लोष शिखरावर साजरा केला. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील ११ दिव्यांगांचा समावेश होता. औरंगाबाद येथील शिवुर्जा प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून कळसुबाई शिखरावर दिव्यांगांसाठी ऊर्जा मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजीराव गाडे हे दिव्यांग असून जिद्दी व आत्मविश्वास असलेल्या दिव्यांगांसाठी ते २०१० पासून कळसुबाई शिखरावर ऊर्जा मोहिमेचे आयोजन करतात.

यावर्षी आयोजित केलेल्या अकराव्या मोहिमेसाठी आंबेगाव तालुका दिव्यांग संघटनेचे उपाध्यक्ष दिव्यांग ज्ञानेश्वर शिंदे (रा. सुलतानपूर-एकलहरे ता. आंबेगाव), जीवन टोपे, राजू सुपेकर, नवनाथ वर्प, जान्हवी बोत्रे (ता. खेड), अर्चना घुडरे (श्री क्षेत्र आळंदी), सुरेखा ढवळे (ता. पुरंदर), रघुनाथ सातव, किरण शिपी, अनिता जाधव (ता. हवेली) यांनी सहभाग नोंदवला. अन्य जिल्ह्यातील अस्थिव्यंग, अंध, मूकबधिर, बहु विकलांग, मतिमंदसह सर्व प्रकारच्या १११ दिव्यांग सहभागी झाले होते.

### महात्मा ज्योतिबा फुले मंडळाच्यावतीने

# सावित्रीच्या 21 लेकींचा सन्मान!

## सहकार व इतर मागास व विशेष मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सन्मानित




**पिंपरी । महाईन्यूज ।**

**आपण वर्षभर उपक्रम राबवले तरी दिवस कमीच पडतील इतके महान कार्य सावित्रीबाई फुलेंनी केले आहे. त्या काळात त्यांनी महिला सबलीकरणाची चळवळ उभी केल्याने आज महिला उच्च पदावर कार्यरत असल्याचे पहायला मिळत आहे. यासाठी त्यांना बऱ्याच गोष्टींचा त्याग करावा लागला. आज सावित्रीबाईंच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार प्राप्त या समाजातील आदर्शवत महिला आहेत असे गौरवोद्गार सहकार व इतर मागास व विशेष मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी काढले. महात्मा ज्योतिबा फुले मंडळ पिंपरी चिंचवडच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २१ महिलांचा "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार-२३" देवून सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.**

हा पुरस्कार सोहळा चिंचवड येथील कै.प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात संपन्न झाला. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.दिलीप भुजबळ, पुणे मनपा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष रवींद्र चौधरी, उद्योजक दीपकनाना कुदळे, पिंपरी चिंचवड सीए इंस्टिट्यूटचे माजी अध्यक्ष सीए सुहास गार्डी, इंडियन मेडिकल असोसिएशन पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष डॉ. विजय सातव, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या शहराध्यक्ष कविता आल्हाट, माजी नगरसेवक वसंत लोंढे, सुरेश म्हेत्रे, संगीता ताम्हणे, ओबीसी संघर्ष समितीचे अध्यक्ष आनंदा कुदळे, मोहन भूमकर, रेखा दर्शिले, धनंजय वर्णेकर, गणेश दळवी, समिता गोरे, उद्योजक संजय जगताप, भरत आल्हाट, दिशा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजू कर्पे, प्रशांत डोके, करमोळीचे सरपंच शरद केदारी, मीना माळी, चित्रपट निर्माते निवृत्ती बोराटे, वंदना जाधव, सोनम जांभूळकर, काळूराम गायकवाड, महात्मा ज्योतिबा फुले मंडळाचे अध्यक्ष हनुमंत माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थी पुढीलप्रमाणे श्रीमती अंजना जमदाडे-(आदर्श माता), श्रीमती प्रमिला टिळेकर (आदर्श माता), सुरैय्या सिकंदर शेख फातिमा – (सावित्री पुरस्कार), श्री गुरुमाँ मधु गोस्वामी, (राज्यस्तरीय – आध्यात्म भूषण पुरस्कार), सुनिता राऊत (राज्यस्तरीय कृषी भूषण), मधुरा भेलके (राज्यस्तरीय समाज भूषण), मंजिरीताई धाडगे (राज्यस्तरीय समाज भूषण), विजया गारुडकर – (राज्यस्तरीय उद्योगभूषण), निशा बेलसरे (शिक्षण भूषण पुरस्कार), प्राजक्ता रुद्रवार (शिक्षक भूषणपुरस्कार), प्रमिला गोरे (आदर्श शिक्षिका), पोलिस निरीक्षक सुचेता खोकले (कर्तव्य भूषण पुरस्कार), वर्षा कांबळे (पत्रकार भूषण पुरस्कार), आशा कांबळे (समाज भूषण), माधुरी कोले (समाज भूषण), रोहिणी रासकर (समाज भूषण), कु. रिद्धी गायकवाड (क्रीडा भूषणपुरस्कार), तृप्ती रामाणे (व्यवसाय भूषण) अश्विनी दर्शले (व्यवसाय भूषण), श्रद्धा कातळे (कला भूषण), सुनिताराजे पवार (साहित्य भूषण पुरस्कार) यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हनुमंत माळी यांनी केले.

### 1500 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**ओबीसींसाठी शासनाच्या भरपूर असलेल्या सुविधांचा लाभ घेतला पाहिजेत. ओबीसींच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील ३ वर्षांत ७२ वसतीगृह निर्माण करीत आहोत. विदर्भात ५ ठिकाणी भाडेतत्त्वावर जागा घेवून सुरू करायचे नियोजन आहे. ६०% मुलींच्या तर ४०% मुलांच्या वसतिगृहासाठी केंद्र सरकारचे अनुदान मिळणार आहे.पूर्वी चारशे विद्यार्थ्यांना पीएचडी साठी शिष्यवृत्ती दिली जायची आज १२३६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.पूर्वी २०० स्पर्धा परिक्षाच्या विद्यार्थ्यांना आज १५०० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे.**

"स्व. प्रमोद महाजन सांगायचे कि संगणक साक्षरता झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही. संगणक किंवा मोबाईलमुळे हायटेक झाले पाहिजेत. मात्र आधुनिक युगात हायटेक होताना आपली हिंदू संस्कृती आणि आईवडिलांना विसरू नका. माळी समाज हा शेती करणारा लाजाळू आहे. मात्र आज शांत आणि लाजाळू राहून चालणार नाही तर इतर समाजासारखे माळी समाज आक्रमक बनला पाहिजेत.तरुणांनी स्पर्धा परीक्षेकडे अधिक लक्ष दिले पाहिजेत.

**- अतुल सावे,**
सहकार व इतर मागास व विशेष मागासवर्ग कल्याण मंत्री

# महागाई, बेरोजगारीविरोधात आज महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसची जनजागर

## महाराष्ट्र प्रदेश महिला राष्ट्रवादीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात मोहीम, कोपरा सभेचेही आयोजन

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्रसह संपूर्ण देशात वाढलेली महागाई, तरुणांच्या हाताला नसणारे रोजगार, त्याच बरोबर केंद्र, राज्य आणि पिंपरी चिंचवड शहरात भाजपाचा वाढलेला भ्रष्टाचार, भाजपा नेत्यांकडून थोर पुरुषांविषयी वारंवार केली जाणारी अपमान जनक वक्तव्ये,



आधीच बेरोजगारी वाढली असताना महाराष्ट्रातून बाहेर जाणारे उद्योग-धंदे, शहरात वाढलेली गुन्हेगारी या ज्वलंत विषयांवर जनतेत जागृती करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश महिला राष्ट्रवादीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या जन जागर यात्रेचे दि. ५ जानेवारी २०२३ रोजी पिंपरी-चिंचवड शहरात आगमन होत आहे.यानिमित्ताने जन जागर कोपरा सभेचे आयोजन केलेले आहे.

### या ठिकाणी असणार कोपरा सभा...

**या जन जागर यात्रे निमीत्ताने डिलक्स चौक, पिंपरी येथे दुपारी ०३:०० वाजता, खंडोबा माळ, आकुर्डी येथे सायंकाळी ०४:३० वाजता, गोसावी हॉस्पीटल, रूपीनगर येथे ०६:०० वाजता या ठिकाणी कोपरासभा आयोजित केल्या असून शहरातील जनजागर यात्रेची समारोप सभा पी.एम.टी. चौक, भोसरी येथे सायंकाळी ८.०० वाजता होणार आहे. देश पातळी, राज्य पातळी त्याचबरोबर शहरातील वरील मुद्यांची दखल घेऊन जास्तीत जास्त संख्येने नागरीकांनी आपआपल्या भागात या जन जागर यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन अजित गव्हाणे आणि कविता आल्हाट यांनी केले आहे.**

## संपादकीय »

# बेतालांची अहमहमिका !

***छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल उलट सुलट विधाने करण्याची अहमहमिका सुरू असावी असे वातावरण सध्या राज्यात आहे. महापुरुषांविषयी पूर्ण माहिती न घेताच नको ती बडबड करून वाद उकरून काढायचा ही राजकारण्यांची खोड जुनी आहे.***

समाजात नेमका कोणता संदेश जातोय याची तमा बाळगण्याची या नेत्यांना गरज नसते. महापुरुषांबद्दल वाट्टेल ते बोलल्याने ते लहान होत नसतात, मात्र टकळी चालविणारे नेते खुजे होऊन जातात. नागपूर अधिवेशनाचा समारोप होत असताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांबद्दल वक्तव्य करून नसती राळ अंगावर ओढून घेतली आहे. आपल्या भाषणात त्यांनी संभाजी महाराजांचा उल्लेख स्वराज्यरक्षक असा करताना काही लोक त्यांना धर्मवीर म्हणत असल्याचे वक्तव्य केले.

खरं तर राज्यात अनेक प्रश्न आहेत की त्यावर बोलण्यासारखे खूप काही आहे आणि अजित पवार यांच्यासारख्या जबाबदार नेत्याने यावर काहीतरी बोलावे अशी जनतेची अपेक्षा होती, पण अजित पवार बोलले ते संभाजी महाराजांबद्दल! स्वाभाविक भाजपसह शिंदे गट, तसेच हिंदुत्ववादी संघटनांकडून पवार यांच्यावर टीकेची झोड उठली. इतकेच नव्हे तर त्या वक्तव्याची प्रतिक्रिया राज्याच्या विविध भागात उमटली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तारतम्य बाळगण्याचा सल्ला पवार यांना दिला आहे. भाजपच्या नेतेमंडळींनीही पवार यांच्या वक्तव्याचा खरपूस शब्दात समाचार घेतला.

टीकेची धग थेट बारामतीपर्यंतही पोहचली. विरोधकांनी निषेध आंदोलने करून वातावरण तापवले असताना या वादात कारण नसताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी उडी घेतली. हे सर्व पाहिल्यानंतर कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा असे म्हणण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजी महाराज यांची कर्तृत्ववान राजा अशी ओळख आहे. त्यांचा संपूर्ण इतिहास जाणून घेतला तर अंगावर रोमांच उभा करणारा आहे. संभाजी महाराजांनी धर्मकार्यासाठी योजलेल्या उपायांची इतिहासाने ठळकपणे नोंद केली आहे. इंग्रज, पोर्तुगीज, मुसलमान यांच्याकडून होणाऱ्या सक्तीच्या धर्मांतराला संभाजी महाराजांचा छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच सक्त विरोध होता.

# ‘भारत जोडो’नंतर पुढे काय?






‘सत्य कवच’ वगैरे असण्याने पक्षाचे भले होत नाही किंवा व्यक्तीचे संरक्षणही. प्रियांका यांना राहुल यांचे कौतुकसोहळे करायचेच असतील, तर ते घरापुरते ठीक..

काँग्रेस पक्षाची दृश्यमानता वाढली असेल/ नसेल, पण राहुल गांधी यांच्या ‘भारत जोडो’मुळे त्यांची स्वतःची दृश्यमानता वाढली हे निश्चित. त्यांच्या यात्रेने आता शेवटच्या टप्प्यात प्रवेश केला आहे. कन्याकुमारीपासून इतके सारे अंतर केवळ पायी कापणे हे येरागबाळ्याचे काम नाही. भौगोलिक, वातावरणीय बदल आदींपासून स्वतःचे आरोग्य राखत हा खंडप्राय देश उभा-आडवा पायी चालून पाहण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची सुरुवातीला रेवडी उडवली गेली. यात्रा सुरू झाल्यावर राहुल यांनी घातलेला टीशर्ट कोणत्या कंपनीचा, किती किमतीचा यावर धुरळा उडवून दिला गेला. तरी बरे तो उडवणाऱ्या पक्षाच्या नेत्यांस उंची वस्त्रप्रावरणांचे वावडे नाही. पण तरीही या हास्यास्पद मुद्द्यांवर चर्चा घडवली गेली. त्याचा काहीही परिणाम न होऊन राहुल चालत राहिल्याने आणि त्यांच्या मागे अथवा बरोबर चालणाऱ्यांची संख्या वाढती राहिल्याने या फिजूल चर्चा थांबवल्या गेल्या. ते इकडे का गेले नाहीत, तिकडेच का गेले इत्यादी मुद्द्यांवरही चर्वितचर्वण करून झाले. वास्तविक कोणत्या मार्गाने कसे जायचे हा त्या पथिकाचा प्रश्न. इतरांनी त्यास अमुक मार्ग का निवडला नाही, हे विचारण्याचे काहीच कारण नाही. पण तरीही हे सर्व झाले. मिळेल त्या मार्गाने ही यात्रा निष्फळ ठरवण्याचे झालेले प्रयत्न खरे तर हास्यास्पद होते. कारण त्यामुळे उलट त्या यात्रेस अधिक प्रसिद्धी मिळाली. शेवटच्या टप्प्याआधी करोनाचे निमित्त पुढे करून यात्रा विफल करण्याचा प्रयत्न आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी करून पाहिला. पण त्यांना स्वपक्षीय नेत्यांनी आवरले असावे. अन्यथा यात्रेस अधिक प्रसिद्धी मिळती. ही यात्रा शेवटच्या टप्प्यासाठी मार्गस्थ होत असताना दिल्लीत राहुल यांच्या हातावर दही-साखर ठेवण्याचा सोहळा झाला. तो ठीक. पण त्यात राहुल यांच्या भगिनी प्रियांका गांधी यांनी जे तारे तोडले त्याचा समाचार घेणे आवश्यक ठरते.

“राहुल यांस सत्याचे कवच आहे. त्यामुळे खुद्द परमेश्वर त्यांस सुरक्षित ठेवेल,” अशा अर्थाचे एक बावळट विधान प्रियांका यांनी केले. यातील बावळट हे विशेषण अनेक अर्थांनी लागू होते. एक म्हणजे परमेश्वर सत्याचे रक्षण करण्यासाठी एकेका व्यक्तीस सुरक्षित ठेवण्याइतका सक्षम आहे, याचा काही पुरावा नाही. तसा तो असता तर रामायण, महाभारतापासून आजच्या युक्रेन युद्धापर्यंत काही घडले नसते. तेव्हा उगाच काल्पनिक परमेश्वरास कामास लावण्याचे काही कारण नाही. आणि दुसरे असे की जिचे तीर्थरूप आणि आजी दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मारले गेले आहेत त्या व्यक्तीने तरी सत्य कवच वगैरे बकवास करू नये. सत्य, परमेश्वर वगैरे विधाने खरी मानली तर त्याचा अर्थ प्रियांकाताई आपले वडील आणि आजीस अप्रत्यक्षपणे असत्यवादी ठरवतात. आणखी एक मुद्दा असा की सत्य हे रक्षणकर्ते असते, तर गेल्या आठवड्यात राहुल यांच्या सुरक्षेचा मुद्दा काँग्रेसजनांनी हाती घेण्याची काही गरज नव्हती. कशास हवे एसपीजी, एनएसजी कमांडो वगैरे.. सत्य कवच आहेच, असे प्रियांकाताई म्हणू शकल्या असत्या. राजकारण भावनेवर चालते हे खरेच. पण ही भावना सर्व नाही; तरी जास्तीत जास्त जणांस स्पर्श करणारी हवी. एक भाऊ म्हणून प्रियांका यांस बंधू राहुल यांचे कौतुक वाटणे योग्यच. पण हे असले नाते-संबंधाचे कौतुक सोहळे भय्यादूज किंवा रक्षाबंधनप्रसंगी घरात साजरे केले जावेत. राजकारणाच्या मोहिमेवर निघालेल्याभोवती या असल्या भावनांच्या ठिपक्यांची रांगोळी काढण्याची काही गरज नाही. ते बालिश आणि हास्यास्पद दिसते.

# केंद्रीय अधिभारांच्या वाढत्या टक्क्याचे नियमितीकरण

**पंतप्रधानांनी थेट राज्यांतील अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी काय हा निराळा मुद्दा असला तरी, त्यानिमित्ताने केंद्र-राज्य संबंधांतील कळीचे आर्थिक प्रश्न चर्चिले जावेत.... तसे झाल्यास, केंद्रीय अधिभारांच्या वाढत्या टक्क्याचे नियमितीकरण आणि राज्यांना त्यातील वाटा, हा बिगर-राजकीय मुद्दा महत्त्वाचा ठरेल..**

राजधानी दिल्लीत गुरुवार, ५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या तीन दिवसीय अधिकारी परिषदेत केंद्र-राज्य संबंध आणि या दोहोंतील महसूल वाटप हे महत्त्वाचे मुद्दे चर्चिले जातील. या अधिकारी-पातळीवरील परिषदेत सहभागी होणाऱ्या राज्या-राज्यांच्या मुख्य सचिवांस पंतप्रधान मार्गदर्शन करतील. केंद्रात जे महत्त्व मंत्रिमंडळ सचिवांचे ते राज्यात मुख्य सचिवांचे. दोन्ही पदे प्रशासकीय. राज्यात मुख्य सचिव हा सर्वोच्च नोकरशहा तर केंद्रात ते अधिकार मंत्रिमंडळ सचिव या पदाचे. राज्यातील प्रशासकीय यंत्रणेचे नियंत्रण मुख्य सचिवांकडे असते. सर्वसाधारण प्रथा अशी की केंद्राकडून राज्यांकडे येणारा आदेश/सूचना यांचा प्रवाह हा सचिवांच्या मार्गाने होतो. म्हणजे असे की कोणी केंद्रीय मंत्री थेट राज्यस्तरावरील अधिकाऱ्यांस काही आदेश देतो असे सहसा होत नाही. हे असे संकेतपालन हा नोकरशाहीच्या स्थैर्याचा कणा आहे. त्यांचे पालन न करण्यात नोकरशाहीची परिणामी प्रशासनाची कुचंबणा होण्याचा धोका अटळ. उदाहरणार्थ केंद्रीय



मंत्र्याने अथवा थेट पंतप्रधानांनीच राज्यस्तरीय मुख्य सचिवांस काही सूचना/आदेश दिले तर या अधिकाऱ्यांसमोर भलतीच आफत निर्माण होऊ शकते. राज्याचा मुख्य सचिव हा मुख्यमंत्र्यांस बांधील. तेव्हा केंद्राने आदेश दिला तरी त्याच्या पालनार्थ मुख्यमंत्र्यांची संमती हवी. समजा मुख्यमंत्री आणि पंतप्रधान भिन्न राजकीय पक्षांचे असले तर काय परिस्थिती होईल याचा अंदाज बांधता येणे अवघड नाही. करोनाकाळात देशाने ही परिस्थिती अनुभवली. सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांस या काळात पंतप्रधानांनी संबोधित करून मार्गदर्शन केले. ज्यांस हे मुख्य सचिव बांधील ते मुख्यमंत्री शेजारी आणि समोर पंतप्रधान अशी ही अवघड अवस्था. गुरुवारी सुरू होणाऱ्या बैठकीत राज्यांचे मुख्यमंत्री नसतील. पण राज्यांच्या मुख्य सचिवांस विविध केंद्रीय योजनांबाबत पंतप्रधानांचे मार्गदर्शन लाभेल. नेमका हाच मुद्दा केंद्र-राज्य संबंधांबाबत कळीचा बनला असून तमिळनाडू, बिहार, राजस्थान आदी राज्ये केंद्र-पुरस्कृत योजनांची संख्या कमी करण्याची मागणी करतात त्यामागील कारण हेच. गेली आठ वर्षे केंद्राकडून विविध योजनांचा सपाटा सुरू आहे. केंद्राने या योजना जाहीर केल्या तरी त्यांची अंमलबजावणी राज्यांस करावी लागते. म्हणजे त्यासाठीच्या खर्चाचा भार राज्यांस उचलावा लागतो. राज्यांनी त्याबाबत आवश्यक तितकी तरतूद केली तरच केंद्राकडून उर्वरित वाटा उचलला जातो. भाजपशासित राज्ये ही परिस्थिती गुमानपणे मान्य करतात, यात आश्चर्य नाही. तथापि भाजपेतर राज्यांस ही परिस्थिती मान्य होणे अशक्य. त्याचमुळे या राज्यांचे म्हणणे असे की दिल्लीतून तुम्ही अशाच योजना जाहीर करणार असाल तर त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधीही द्या. ही मागणी अजिबात गैर नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महावितरणचा संप मागे !

## मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीला यश; बैठकीत वीज कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा

। मुंबई। महाईन्यूज ।

**राज्यभरातील आज सकाळपासून बत्ती गुल झाली होती. महावितरण कंपनीच्या खासगीकरणाच्या विरोधात कर्मचाऱ्यांनी 3 दिवसांचा संप पुकारला होता. तर वीज कर्मचारी संपावर गेल्यास मेस्मा म्हणजे अत्यावश्यक सेवा कायदा लागू करण्याचा इशारा राज्य सरकारनं दिला होता. अखेर सरकारने हा कायदा लागू केला आहे. त्यामुळे संपकरी कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार होती. सरकारच्या इशाऱ्यानंतरही संपकरी कर्मचारी ठाम होते.**



### वीज कंपन्यांचे कोणतेही खासगीकरण नाही

**राज्य सरकारला कोणत्याही कंपन्यांच खासगीकरण करायचं नाही. राज्य सरकारला तिन्ही कंपन्यांच खासगीकरण करायचं नाही. ३२ संघटनांशी सकारात्मक चर्चा झाली आहे. तीन ते चार मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली. वीज कंपन्यांमध्ये सरकार गुंतवणूक करणार आहे. वीज कंपन्यांमध्ये ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. ही चर्चा सकारात्मक झाल्याचेही फडणवीस यावेळी म्हणालेत.**

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाचे अधिकारी, महावितरण, महानिर्मिती, महापारेषण विभागाचे अधिकारी आणि विविध वीज कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सह्याद्री अतिथीगृहात आज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास बैठक झाली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना म्हटले की, राज्य सरकारला वीज कंपन्यांचे कोणतेही खासगीकरण करायचे नाही.**

त्यानंतर आज दुपारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केली होती. हा संप मागे घेण्यासाठी त्यांनी महावितरण कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संपावर तोडगा काढण्यासाठी चर्चा केली. त्याबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, महावितरणचे खासगीकरण करायचे नाही. त्याबद्दल कोणताही विचार नाही असंही फडणवीस म्हणाले आहेत. आज वीज कर्मचारी आणि उपमुख्यमंत्री-उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात बैठक पार पडली, या बैठकीत वीज कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा निघाला आहे.

राज्य सरकारला कोणत्याही कंपन्यांच खासगीकरण करायचं नाही. राज्य सरकारला तिन्ही कंपन्यांच खासगीकरण करायचं नाही. ३२ संघटनांशी सकारात्मक चर्चा झाली आहे. तीन ते चार मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाली. वीज कंपन्यांमध्ये सरकार गुंतवणूक करणार आहे. वीज कंपन्यांमध्ये ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. ही चर्चा सकारात्मक झाल्याचेही फडणवीस यावेळी म्हणालेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ऊर्जा विभागाचे अधिकारी, महावितरण, महानिर्मिती, महापारेषण विभागाचे अधिकारी आणि विविध वीज कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सह्याद्री अतिथीगृहात आज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास बैठक झाली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना म्हटले की, राज्य सरकारला वीज कंपन्यांचे कोणतेही खासगीकरण करायचे नाही.

येत्या तीन वर्षात राज्य सरकार 50 हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. अदानी समूहाने समांतर परवान्यासाठी अर्ज केला. त्याच्या निषेधार्थ हा संप करण्यात आला होता. याबाबत बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, समांतर परवान्याबाबत महावितरण, सरकारने अर्ज वीज नियामक आयोगाकडे करायला हवे अशी भूमिका वीज कर्मचारी संघटनांनी मांडली होती.

राज्य वीज नियामक आयोगाकडे आपल्या हिताचे निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका सरकार घेईल, असे फडणवीस यांनी म्हटले. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. कामगार संघटनांनी घेतलेली भूमिका ही राज्य सरकारची भूमिका असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

# मी कधीही चुकीच बोललो नाही!

## 'त्या' वक्तव्यावर अजित पवार ठाम

। मुंबई । महाईन्यूज ।

विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांवर केलेल्या वक्तव्यामुळे चांगलाच वाद पेटला आहे. दरम्यान, अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेत वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले आहे.

मी कधीच महापुरुषांबाबात चुकीचं वक्तव्य केलेलं नाही. माझा राजीनामा मागण्याचा अधिकार भाजपला नाही. मला विरोधीपक्ष नेते हे पद राष्ट्रवादीने दिलेलं आहे. मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे. महापुरुषांचा अपमान करणाऱ्या भाजप नेत्यांवर कारवाई कधी होणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा स्वतंत्र्य अधिकार असतो.

इतिहासाच्या आधारावर विधानसभेत बोललो. संभाजी महाराजांना स्वराज्यरक्षकच म्हणायला हवं. मी माझी भूमिका मांडली. ज्यांना योग्य वाटलं त्यांनी स्विकारावं. कुणी धर्मवीर म्हणेल तर तो त्यांचा प्रश्न. स्वराज्यात सगळ्या जाती धर्मांचे लोकं. अनेकांनी स्वतःला धर्मवीर म्हणून घेतलं. असा



टोमणा अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला.

तसेच राज्यपालांविरोधात भाजप गप्प का? असं मी कोणता गुन्हा केला आहे. असं मी काय चुकीच महाराजांबद्दल काय बोललो. असा सवालही पवार यांनी उपस्थित केला आणि माझा राजीनामा मागणाऱ्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे. असही पवार यावेळी म्हणाले.

# 'अदानी गो बॅक'च्या घोषणा अन् अनेक गावांची 'बत्तीगुल'

। वाशिम । महाईन्यूज ।

महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपन्यातील खासगीकरण धोरणाला विरोध आणि आदानी कंपनीला समांतर वीज वितरणाचा परवाना देऊ नये, यासह इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी-अधिकारी संघर्ष समितीने तीन दिवसीय संप पुकारला आहे.

या संपामुळे जिल्ह्यातील ४० टक्के भागाचा विद्युत पुरवठा खंडीत झाला आहे. जिल्ह्यातील ६५० कर्मचारी संपात सहभागी



झाले असून १५ ते २० उपकेंद्रावर कर्मचारी हजर नसल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यावर वीज संकट ओढवण्याची चिन्हे आहे.

जिल्ह्यातील संपकरी कर्मचारी आता चांगलेच आक्रमक झाले आहे. 'आदानी गो बॅक', वीज कंपन्यांचे खासगीकरण थांबवा, आदी मागण्या कर्मचा-यांकडून केल्या जात आहे. याचबरोबर सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजीही करण्यात येत आहे.

# राज्यात शिवशक्ती-भीमशक्ती आणखी मजबूत!

## केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले



**शिंदे गटाबरोबर युती झाल्यावर कवाडे यांनी 'सर्वसामान्यात मिसळणारा, धाडसी मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभला आहे,' अशी स्तुतीसुमनेही उधळली. मंत्री आठवले यांची, त्रिपुराची राजधानी आगरतळामध्ये आज जाहीर सभा होती. यंदा होणाऱ्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षासाठी (आठवले गट) भाजपने दोन जागा सोडाव्यात अशी मागणी त्यांनी केली.**

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना आणि प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स रिपब्लिकन पक्षाची युती झाली हे स्वागतार्ह आहे. यामुळे राज्यात शिवशक्ती-भीमशक्ती आणखी मजबूत होईल. प्रवाहाबरोबर चालले की दलित समाजासाठीच ते फायद्याचे ठरते हे यापूर्वीही दिसून आले आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांनीही राज्यातील सत्ताधारी युतीबरोबर यावे,' असे केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले ' ला सांगितले.

शिंदे गटाबरोबर युती झाल्यावर कवाडे यांनी 'सर्वसामान्यात मिसळणारा, धाडसी मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभला आहे,' अशी स्तुतीसुमनेही उधळली. मंत्री आठवले यांची, त्रिपुराची राजधानी आगरतळामध्ये आज जाहीर सभा होती. यंदा होणाऱ्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षासाठी (आठवले गट) भाजपने दोन जागा सोडाव्यात अशी मागणी त्यांनी केली.

आठवले यांनी दूरध्वनीवरून सकाळशी बोलताना कवाडे यांच्या युतीबरोबर येण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. ठाकरे यांच्याबरोबर जाण्यात शहाणपणा नाही हे ओळखून भारिप-बहुजन महासंघाचे नेते बाळासाहेब आंबेडकरांनीही राज्यातील शिवशक्ती बरोबर यावे असे आवाहन करून आठवले म्हणाले की भाजपबरोबर या, असे आवाहन मी रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटांना केले होते.

"दलित समाजाने सत्तेपर्यंत पोहोचले पाहिजे,' असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे. मात्र दलित समाज स्वतःच्या ताकदीवर एकहाती देशाच्या तसेच राज्याच्या सत्तेत येऊ शकत नाही हे दिसत आहे. त्यामुळे प्रवाहाबरोबर चालले तरच समाजाचा फायदा मिळतो. आंबेडकरी चळवळीनेही कवाडे यांच्याप्रमाणे निर्णय घेतला तर समाजाचेच भले होईल. सद्यस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपबरोबर जाण्यातच रिपब्लिकन पक्षातील गटांचा भलेपणा आहे हे नेत्यांनी ओळखावे.

दरम्यान महाराष्ट्रात भाजप-शिंदे गटाबरोबर युती करणारे कवाडे यांना लगेचच मंत्रिपद मिळण्याची शक्य दिसत नसल्याचेही आठवले यांनी सांगितले. ते म्हणाले की मुख्यमंत्री शिंदे यांनी ठरवले तर कवाडे गटाला एखादे महामंडळ मिळू शकते.

# ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्टला केंद्र सरकारची मंजुरी

## केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली माहिती

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी ग्रीन हायड्रोजन प्रकल्पाला केंद्र सरकारने बुधवारी मंजुरी दिली. यासाठी १९,७४४ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. इलेक्ट्रोलायझर अक्षय ऊर्जा (रिन्यूएबल एनर्जी) व ग्रीन हायड्रोजनच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी सुमारे १७०० कोटी खर्च केले जाणार आहेत. देशभरात ग्रीन हायड्रोजनची केंद्रे उभारणीसाठी ४०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली.

ग्रीन हायड्रोजन हा स्वच्छ ऊर्जेचा स्रोत आहे. हायड्रोजनच्या वापरामुळे प्रदुषण होत नाही. पाण्यातून हायड्रोजन आणि ऑक्सिजन वेगळे करुन ग्रीन हायड्रोजनची निर्मिती केली जाते. या प्रक्रियेत इलेक्ट्रोलायझरचा वापर केला जातो. सौर व पवन ऊर्जेचा यात समावेश असतो. रसायने (केमिकल), लोह, पोलाद, वाहतूक, हीटिंग व वीज यासाठी ग्रीन हायड्रोजनचा वापर केला जातो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही पेट्रोल, डिझेलला पर्याय म्हणून ग्रीन हायड्रोजन कारचा पर्याय दिला जाणार असल्याचे सांगितले होते. वाढत्या इंधनदरामुळे या पर्यायाची चाचपणी झाली होती. मात्र आधी बॅटरीवर चालणारी वाहने बाजारात आली. तसेच गेल्या वर्षी स्वातंत्र्य दिनी पंतप्रधान मोदी यांनी ग्रीन हायड्रोजन निर्मितीची घोषणा केली होती. त्यानुसार या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याचे मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले.

ग्रीन हायड्रोजन प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा, वाहतूक व शिपिंग क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे. सन २०३० पर्यंत भारत ग्रीन हायड्रोजन निर्मितीत अग्रक्रमांकावर असेल. यात जवळपास ८ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच याद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असा दावाही केंद्र सरकारने केला आहे. हायड्रोजनची निर्मिती हरित स्त्रोतातून करणे हे राष्ट्रीय हायड्रोजन मिशनचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारताला हायड्रोजन व इंधन निर्मितीचे केंद्र बनवण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. ग्रीन हायड्रोजनची निर्यात करण्यासाठी बंदरांजवळ स्टोरेज बंकर उभारण्यासही परवानगी दिली जाणार आहे. त्यासाठी ग्रीन हायड्रोजन उत्पादकांकडून माफक शुल्क घेतले जाईल, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले होते.

# केंद्रीय मंत्रिमंडळ, भाजपमध्ये संघटनात्मक बदलांचे संकेत

## 16-17 जानेवारीला राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक १६ व १७ जानेवारी रोजी होत असून यात पक्षाध्यक्षपदी जे. पी. नड्डा यांना मुदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे. मात्र बैठकीच्या निमित्ताने पक्षात अनेक मोठे संघटनात्मक बदल केले जाण्याची शक्यता असून केंद्रीय मंत्रिमंडळातही फेरबदल होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी आधीपासून सुरू झाली असून विरोधकांच्या ताब्यात असलेल्या देशभरातील १६० लोकसभा मतदारसंघांवर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दोघेही झंझावाती दौरे करत आहेत. नड्डा यांची पक्षाध्यक्षपदाची मुदत २० जानेवारी रोजी संपत असली तरी कार्यकारिणी बैठकीत मुदतवाढीवर शिक्कामोर्तब केले जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र काही केंद्रीय मंत्र्यांना संघटनात्मक जबाबदारी दिली जाणार असल्याची चर्चा असल्यामुळे कार्यकारिणी बैठकीत राष्ट्रीय महासचिव, राष्ट्रीय सचिव आणि प्रभारींमध्ये बदल केले जाणार असल्याचे समजते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी म्हणजे १५ ते ३० जानेवारी या काळात पक्ष संघटना आणि केंद्रीय मंत्रिमंडळात हे बदल केले जाऊ शकतात. लोकसभा निवडणुकीपूर्वी होणारे हे अखेरचे फेरबदल असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत विश्वासू सी. आर. पाटील यांना केंद्रित मंत्रिमंडळाऐवजी संघटनेत सक्रिय केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### मंत्रिमंडळात नवे चेहरे?

**येत्या काही दिवसांत केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता असून काही विद्यमान मंत्र्यांना डच्चू दिला जाऊ शकतो. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, धर्मेंद्र प्रधान, मनसुख मंडाविया, भूपेंद्र यादव आदींचा अपवाद वगळता इतरांचे 'प्रगतिपुस्तक' तपासले जात आहे. त्यामुळे मोदी सरकारमधील बहुतांश मंत्र्यांवर टांगती तलवार आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदे गटाला केंद्रात सामावून घेतले जाण्याची शक्यता आहे.**

# अदानी-अंबानी राहुल गांधींना विकत घेऊ शकणार नाहीत!

## 'भारत जोडो' यात्रेत प्रियंका गांधी-वढेरा यांचा हल्लाबोल

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



अदानी-अंबानींसारख्या उद्योजकांनी इतर राजकीय नेत्यांना, सरकारी कंपन्यांना आणि प्रसारमाध्यमांना विकत घेतले असेल. पण, ते राहुल गांधींना विकत घेऊ शकले नाहीत आणि त्यांना कधीही विकत घेताही येणार नाही, असा हल्लाबोल काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी-वढेरा यांनी केला.

राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या भारत जोडो यात्रेने मंगळवारी दिल्लीतून उत्तर प्रदेशात प्रवेश केला. त्यावेळी सीमेवरील लोणीमध्ये झालेल्या स्वागत समारंभात प्रियंका बोलत होत्या. 'भारत जोडो' यात्रेचा दुसरा टप्पा सुरू झाला असून मंगळवारी यात्रेने दिल्लीतून उत्तर प्रदेशमध्ये प्रवेश केला. प्रियंका गांधी-वढेरा या उत्तर प्रदेशच्या प्रभारी असल्याने त्यांनी यात्रेचे स्वागत केले. उत्तर प्रदेशातील चार दिवसांच्या प्रवासानंतर यात्रा हरियाणा, हिमाचल प्रदेश, पंजाबमार्गे जम्मू-काश्मीरकडे रवाना होईल. 'राहुल गांधींना बदनाम करण्यासाठी केंद्र सरकारने हजारो कोटी रुपये खर्च केले. पण, राहुल गांधींनी सत्याचा मार्ग कधी सोडला नाही. त्यांच्या विरोधात तपास यंत्रणांचा ससेमिरा लावला गेला, मात्र, त्यांना ते कधीही घाबरले नाहीत. ते योद्ध्याप्रमाणे लढत आहेत.

# फक्त दोन दिवस वाट पहा : प्राजक्ता माळी

प्राजक्ता माळी हे सध्याचं चर्चेतलं नाव आहे. सोशल मीडियावर तर तिचं फॅन फॉलोइंग भलतंच वाढताना दिसत आहे. 'रानबाजार' या वेबसिरीजनंतर तर तिच्या बोल्ड अभिनयावर अनेकांनी कौतूकाचा वर्षाव केलेला आपण पाहिला असेल. आता फक्त कौतूकच होतं प्राजक्ताचं तर असं काही नाही बंर का. सोशल मीडियावर जेव्हा-जेव्हा ती राजकीय-सामाजिक भूमिका स्पष्ट करते तेव्हा-तेव्हा ट्रोलही होताना दिसते. आता प्राजक्ता पुन्हा चर्चेत आलीय ते सोशल मीडियावर तिनं पोस्ट केलेल्या व्हिडीओमुळे.(



प्राजक्तानं पोस्ट केलेल्या व्हिडीओत ती सुरुवातीला नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना दिसते. आणि थेट म्हणतेय..."फक्त काही दिवस वाट पहा...मी या नवीन वर्षात तुमच्यासाठी काहीतरी नवीन घेऊन येतेय. आशा आहे तुम्ही माझ्या या नवीन प्रोजेक्टचं देखील कौतूक कराल". बस्स....प्राजक्तानं हा व्हिडीओ पोस्ट केला अन् चाहत्यांना आता उत्सुकता लागलीय ती ६ जानेवारीची. प्राजक्ता नेमकी काय घोषणा करते याकडे सगळ्यांचे डोळे लागलेयत. आता आम्ही थोडीशी तुम्हाला यांदर्भात कल्पना देतो की नेमकी प्राजक्ता कशाविषयी घोषणा करणार आहे,


काही दिवसांपूर्वी प्राजक्तानं छान पारंपरिक दागिने घालून काही फोटो पोस्ट केले होते. तिनं आपलं पारंपरिक दागिन्यांवरचं प्रेमही बोलूनही दाखवलं होतं.अर्थात त्यात झकासच दिसत होती ती, नो डाऊट. पण आता तिनं याच पारंपरिक दागिन्यांचा ब्रान्ड आपल्या चाहत्यांसाठी घेऊन यायचं ठरवलं आहे..ज्याचं नाव आहे 'प्राजक्तराज'...माननीय राज ठाकरे यांच्या हस्तेच प्राजक्ताच्या या नवीन ब्रॅन्डचं ओपनिंग होणार आहे.

# सोनम कपूरने मुंबईतील विकला आलिशान फ्लॅट

बॉलीवूड इंडस्ट्रीत गेल्या काही काळापासून सेलेब्स आपली जुनी प्रॉपर्टी विकून मुंबईत नवीन प्रॉपर्टी खरेदी करत आहेत. गेल्या वर्षी जान्हवी कपूर, अभिनेता शाहिद कपूरसह अनेक सेलिब्रिटींनी आलिशान घरे खरेदी केली होती. त्याचवेळी सोनम कपूरबद्दल बातम्या येत आहेत की तिने मुंबईतील तिचा एक फ्लॅट विकला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सोनम कपूरने नुकताच तिचा 7 वर्ष जुना फ्लॅट विकला आहे. सोनम कपूरचा हा आलिशान फ्लॅट बीकेसी, मुंबईच्या सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये होता. अभिनेत्रीने 29 डिसेंबरला तिचा फ्लॅट 32.5 कोटींना विकला आहे. अभिनेत्रीने फ्लॅट 2015 मध्ये 31.48 कोटी रुपयांना विकत घेतला होता. त्याच वेळी, तिने हा फ्लॅट आता 1 कोटीच्या नफ्यासह विकला आहे. सोनमचे हे घर एसएमएफ इन्फ्रास्ट्रक्चर नावाच्या प्रसिद्ध कंपनीने विकत घेतल्याचे सांगितले जात आहे. अभिनेत्रीचा हा फ्लॅट मुंबईतील बीकेसी अर्थात बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सच्या सीबीडीमध्ये होता. सोनमचे हे घर सिग्नेचर आयलँड नावाच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर होते.



# शाहरुखचा मुलगा आर्यन खान सुपर हॉट नोरा फतेहीला करतोय डेट?






मनोरंजनाच्या जगात सेलिब्रिटी कोण कधी कोणाला डेट करेल सांगता येत नाही. ताजं उदाहरण शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान प्रसिद्ध मॉडेल-डान्सर नोरा फतेहीला डेट करत असल्याची चर्चा आहे. स्टार्समधील लिंकअप आणि ब्रेकअपच्या चर्चा या नेहमीच होत असतात. सध्या सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे ते या चर्चेने बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान डान्सिंग दिवा नोरा फतेहीला डेट करत असल्याचं बोललं जात आहे.

झालं अस की, सोशल मीडियावर दोन्ही स्टार्सचे काही फोटो व्हायरल होत आहेत. अलिकडे आर्यनच नाव अन्यना पांडे बरोबर जोडलं गेलं होतं पण एका पार्टीमध्ये आर्यनने अन्यनाला चक्क इग्नोर केले होते. झालं असं की दुबईमध्ये आर्यन खानने न्यू इयरची पार्टी दिली होती. या पार्टीमध्ये हार्दिक सिंधूशिवाय त्याचे अनेक मित्र दिसले. नोरादेखील पार्टीमध्ये होती. एका फोटोमध्ये आर्यन दिसत आहे तर दुसऱ्या चित्रात नोरा फतेही आहे. मात्र, या फोटोंमध्ये आर्यन आणि नोरासोबत एकच फॅन दिसत आहे. मग काय, लोकांची नजर त्यावर पडताच दोघेही एकमेकांना डेट करत असून गुपचूप एकमेकांसोबत वेळ घालवत असल्याचे नेटिझन्सचे म्हणणे आहे. वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर नोरा फतेही शेवटची 'अॅन अॅक्शन हिरो' या चित्रपटात दिसली होती.

# अखेर दीपा कार्तिक एकत्र आलेच....

स्टार प्रवाह वाहिनीवरील 'रंग माझा वेगळा' ही मालिका बरेच दिवस नंबर वन वर आहे. या मालिकेला प्रेक्षकांनी डोक्यावर उचलून धरलं आहे. गेली तीन वर्षे ही मालिका प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. नुकतंच या मालिकेने 900 भागांचा टप्पा पूर्ण केला. आता ही मालिका अत्यंत रंजक वळणावर आहे. कार्तिक आणि दीपायांचे बिनसलेले नाते अनेक वर्षांनी पुन्हा सांधले जाणार आहे. याच भागाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत.



गेले कित्येक दिवस ज्या दिवसाची प्रेक्षक आतुरतेने वाट पहात होते तो दिवस अखेर दीपा-कार्तिकच्या आयुष्यात आलाय. गैरसमज आणि त्यातून निर्माण झालेल्या दुराव्यामुळे दीपा-कार्तिकने आयुष्यातले महत्त्वाचे क्षण गमावले. कार्तिकी आणि दीपिका या दोन्ही मुलींच्या जन्माचा आनंदही दोघांना एकत्र साजरा करता आला नाही. दोन्ही लेकी दोन वेगळ्या घरांमध्ये लहानाच्या मोठ्या झाल्या. मात्र आता गैरसमजाचं मळभ दूर झालंय.

दीपा-कार्तिकच्या आयुष्यात पुन्हा सुखाचे क्षण येऊ पहात आहेत. आपापसातले हेवेदावे विसरुन दोघंही पुन्हा एकदा विवाहबंधनात अडकणार आहेत. इनामदार कुटुंबात दीपा-कार्तिकच्या लग्नाची जय्यत तयारी सुरु झाली असून मेहंदी, हळद, संगीत आणि लग्न सगळं अगदी साग्रसंगीत पार पडणार आहे.




# उमरानच्या एकाच चेंडूत लंकेचा कर्णधार बाद

## सामना हातात आला अन् बुमराह देखील मागं पडला

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारतीय युवा वेगवान गोलंदाज उमरान मलिक त्याच्या वेगासाठी ओळखला जातो. त्याने आयपीएलमध्ये आपल्या वेगानं सगळ्यांना प्रभावित केलं आहे. भारतीय संघात त्याला म्हणूनच आणलं आणि इथेही तो तशीच गोलंदाजी करत आहे. वानखेडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-20 सामन्यात उमरान मलिकने आपल्या वेगवान गोलंदाजीने अनुभवी गोलंदाज जसप्रीत बुमराहचा मोठा विक्रमही मोडीत काढला आहे. उमरानने 155 किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करत श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाला बाद केले.

उमरान मलिकला श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या टी-20 सामन्यात खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीने ही निवड योग्य ठरवली. त्याने 4 षटकात केवळ 27 धावा देत 2 बळी घेतले. भारताच्या आवाक्याबाहेर सामना जात असताना त्याने श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाची विकेट घेतली. उमरानने 155 किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करून त्याला आश्चर्यचकित केले.

यासोबतच उमरान मलिकने जसप्रीत बुमराहचा मोठा विक्रमही मोडला आहे. आता तो भारतीय गोलंदाजांमध्ये सर्वात वेगवान गोलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम जसप्रीत बुमराहच्या नावावर होता ज्याने 153.36 किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी केली होती. याशिवाय मोहम्मद शमीने 153.3 आणि नवदीप सैनीने 152.85 किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी केली. उमरान मलिक आता या सगळ्यांच्या पुढे गेला आहे. भारतीय संघाने हा सामना दोन धावांनी जिंकून मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

# मुंबई संघाकडे फक्त ३९ धावांची आघाडी

## तुषार देशपांडे विक्रम करणारा ठरला पहिला खेळाडू

**मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

मध्यमगती वेगवान गोलंदाज तुषार देशपांडे व डावखुरा फिरकी गोलंदाज शम्स मुलानी यांनी केलेल्या प्रभावी गोलंदाजीमुळे मुंबईने तमिळनाडूचा पहिला डाव १४४ धावांमध्ये संपुष्टात आणला; मात्र सर्वाधिक रणजी विजेत्या ठरलेल्या मुंबईच्या फलंदाजांना पहिल्या डावात चमक दाखवता आली नाही.

रणजी करंडकातील ब गटाच्या लढतीत पहिल्या दिवसअखेरीस मुंबईची अवस्था ६ बाद १८३ धावा अशी झाली आहे. त्यामुळे मुंबईचा संघ आता फक्त ३९ धावांनी आघाडीवर आहे.



मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले, पण तुषार देशपांडे व मोहित अवस्थी यांच्या गोलंदाजीपुढे तमिळनाडूच्या फलंदाजांचा निभाव लागला नाही. तमिळनाडूचा निम्मा संघ ७३ धावांमध्ये बाद झाला. त्यानंतर प्रदोश पॉल याने ९ चौकारांसह ५५ धावांची खेळी साकारली. त्यामुळे तमिळनाडूला १४४ धावांचा टप्पा ओलांडता आला. तुषारने ३७ धावा देत पाच फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. शम्स मुलानीने ३३ धावा देत तीन फलंदाज गारद केले.

**संक्षिप्त धावफलक :**

तमिळनाडू- पहिला डाव सर्व बाद १४४ धावा (प्रदोश पॉल ५५, तुषार देशपांडे ५/३७, शम्स मुलानी ३/३३) वि. मुंबई ६ बाद १८३ धावा (पृथ्वी शॉ ३५, अजिंक्य रहाणे ४२, सर्फराझ खान नाबाद ४६).

### फलंदाज अपयशी

**मुंबईच्या फलंदाजांना पहिल्या डावात अपयश आले. पृथ्वी शॉ (३५ धावा), यशस्वी जैसवाल (०), अरमान जाफर (४ धावा) यांच्याकडून निराशा झाली. कर्णधार अजिंक्य रहाणेने ४२ धावांची आश्वासक खेळी केली, पण त्याला या खेळीचे रूपांतर मोठ्या खेळीत करता आले नाही. अश्विन क्रीस्टने त्याला बाद केले. हार्दिक तामोरे १० धावांवर; तर शम्स मुलानी २८ धावांवर बाद झाला. सर्फराझ खानने ६ चौकारांसह नाबाद ४६ धावांची खेळी केली असून त्याच्यासोबत तनुष कोटियन ९ धावांवर खेळत आहे. या दोघांच्या खांद्यावरच मुंबईच्या पहिल्या डावाची मदार असणार आहे.**

# मंदिरा बेदी परतणार!

## गुणवान खेळाडूंना 'क्रिकेट का तिकीट?

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानावर सर्वात प्रथम ग्लॅमरचा तडका देण्याणारी अभिनेत्री मंदिरा बेदी आता पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर परतणार आहे. आयपीएलची फ्रेंचायजी राजस्थान रॉयल्स आणि कलर्स या वाहिनीने मिळून एक नवा कोरा क्रिकेट रियलिटी शो लाँच करणार असल्याची घोषणा केली आहे. हा शो ग्लॅमरस आणि प्रसिद्ध क्रिकेट प्रेझेंटर मंदिरा बेदी होस्ट करणार आहे. 'क्रिकेट का तिकीट' असं या शोचं नाव आहे. या शो द्वारे देशभरातील गुणवान क्रिकेटपटूंना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

मंदिरा बेदी ही क्रिकेट जगतात क्रिकेट प्रेझेंटरचा ट्रेंड सुरू करणाऱ्यांपैकी एक मॉडेल म्हणून ओळखली जाते. आता ती क्रिकेट का तिकीट नावाचे एक नवा कोरा शो होस्ट करणार आहे. या शोद्वारे



देशातील गुणवान पुरूष आणि महिला क्रिकेटपाटूंना शोधणे आणि त्यांना पैलू पाडण्याचे काम केले जाणार आहे. हा शो 8 भागात प्रसारित होणार आहे. या शोमध्ये इच्छुकांनी त्यांची प्रवेशिका ही क्रिकहिरोज ॲप द्वारे 15 जानेवारी 2023 पर्यंत सादर करायच्या आहेत. या शोमधील जिंकणाऱ्या महिला आणि पुरूष खेळाडूंना 5 लाख रूपये कॅश प्राईज आणि भविष्यासाठी डेव्हलपमेंट प्रोग्राम देण्यात येईल. या डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये विजेत्या खेळाडूला एक वर्षासाठी राजस्थान रॉयल्सच्या कोचिंग स्टाफ, खेळाडूंकडून मार्गदर्शन लाभणार आहे.